**दि.०१.०१.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजु झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजन लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे**
**कस्तुरी इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई -४०००२०**

आदेश क्र. संलेको-०७-२०२४/प्रशा-राप-सलेअ/वले-१/०२.०२.२०२४/जु.नि.वे./५५०

दिनांक : 22 JUL 2024

**संदर्भ:-**

१. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४, दि.०२.०२.२०२४.
२. शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१८/सेवा-४, दि.०२.०५.२०२४.
३. दि.२४.०६.२०२४ रोजीच्या बैठकिचे इतिवृत्त.

**आदेश:**

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण २०२३ / प्र. क्र. ४६ / सेवा-४, दि.०२.०२.२०२४ अन्वये, दि.०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय देण्यात आला आहे.

२. त्यानुसार, महाराष्ट्र वित्त व लेखा गट-ब (राप) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील खालील नमूद अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्याबाबत विनंती केली आहे.

३. शासन निर्णय, वित्त विभाग दि.०२.०२.२०२४ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील खालील नमूद अधिकारी यांची खालील तक्यातील स्तंभ-३ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास म्हणजेच ०१.११.२००५ पूर्वी पदभरती / जाहिरात / अधिसूचना निर्गमित झाली असल्याने त्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यात येत आहेत.

| अ. क्र | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | पदभरती अधिसूचना /जाहिरात दिनांक / विभाग / कार्यालयाचे नाव | प्रथम नियुक्तीचे पदनाम व दिनांक | वि.वि.शा.नि.दि.०२.०२.२० २४ नुसार पर्याय दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्रीमती मानसी मोहन सकपाळ, सहाय्यक लेखा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे वनवृत्त यांचे कार्यालय , ठाणे. दि.११.०५.२००५ | लिपीक, दि.२४.०१.२००६ | दि.०६.०२.२०२४ |
| २ | श्री. चेतन भाऊ धलपे, सहाय्यक लेखा अधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे वनवृत्त यांचे कार्यालय , ठाणे. दि.११.०५.२००५ | कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक, दि.१०.०२.२००६ | दि.०९.०२.२०२४ |
| ३ | श्रीमती विद्या सागर अधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी, मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य, मंत्रालय, मुंबई. | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे वनवृत्त यांचे कार्यालय , ठाणे. दि.११.०५.२००५ | लिपीक, दि.२४.०१.२००६ | दि.०९.०२.२०२४ |
| ४ | श्री. निलेश कमलाकर केदारे, सहाय्यक लेखा अधिकारी, निवासी आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे वनवृत्त यांचे कार्यालय , ठाणे. दि.११.०५.२००५ | लिपीक, दि.२७.०१.२००६ | दि.२८.०२.२०२४ |
| ५ | श्री. संदीप विजय सावंत, सहाय्यक लेखा अधिकारी, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई. | लघुवाद न्यायालय, मुंबई दि.२९.०६.२००५ | लिपीक-टंकलेखक दि.०२.०१.२००६ | दि.२२.०२.२०२४ |
| ६ | श्री. प्रशांत कृष्णकांत मोरे, सहाय्यक लेखा अधिकारी, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई | लघुवाद न्यायालय, मुंबई दि.२९.०६.२००५ | लिपीक-टंकलेखक दि.०२.०१.२००६ | दि.२२.०२.२०२४ |
| ७ | श्रीमती रुपाली सचिन भोईर, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखा परीक्षा उपविभाग-३, छत्रपती संभाजीनगर. | लघुवाद न्यायालय, मुंबई दि.२९.०६.२००५ | लिपीक-टंकलेखक दि.२४.०८.२००६ | दि.२३.०२.२०२४ |
| ८ | श्री. कैलास सं. बडगुजर, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, धुळे | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे दि.१८.०८.२००४ | कनिष्ठ लिपीक दि.०९.०१.२००६ | दि.०९.०२.२०२४ |

| अ. क्र | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | पदभरती अधिसूचना /जाहिरात दिनांक / विभाग / कार्यालयाचे नाव | प्रथम नियुक्तीचे पदनाम व दिनांक | वि.वि.शा.नि.दि.०२.०२.२० २४ नुसार पर्याय दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ९ | श्री. योगेश शिवाजी चौधरी, सहाय्यक लेखा अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, धुळे | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे दि.१८.०८.२००४ | कनिष्ठ लिपीक दि.०१.११.२००६ | दि.१५.०२.२०२४ |
| १० | श्री. अरुण शिवाजीराव काळे, सहाय्यक लेखा अधिकारी, विभागीय प्रशिक्षण संस्था, पुणे. (प्रतिनियुक्ती) | कारागृह व सुधारसेवा विभाग, पुणे दि.०९.०३.२००५ | वरिष्ठ लिपीक दि.०६.०२.२००६ | दि.१४.०२.२०२४ |
| ११ | श्रीमती प्रतिभा सचिन कदम, सहाय्यक लेखा अधिकारी, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, पुणे | कारागृह व सुधारसेवा विभाग, पुणे दि.०९.०३.२००५ | वरिष्ठ लिपीक दि.१३.०१.२००६ | दि.२७.०२.२०२४ |

४. उपरोक्त अधिकाऱ्यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय विहित मुदतीत सादर केला असून त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०२.०२.२०२४ नुसार जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्यात येत असल्यामुळे त्याचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील खाते आहरण व संवितरण अधिकारी यांनी तात्काळ बंद करावे.

५. उपरोक्त अधिकाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे (GPF) खाते उघडण्यात यावे व सदर खात्यात राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात यावी, तसेच राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्याची आहरण व संवितरण अधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करावी. तसेच सदर अधिका-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम, १९८२ लागू करताना वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१८/सेवा-४ दि. २.०५.२०२४ नुसार कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

६. प्रतिनियुक्तीवरील सहाय्यक लेखा अधिकारी यांच्या बाबतीत उपरोक्त अ.क्र. ४ व ५ प्रमाणे कार्यवाही करण्याकरिता लेखा अधिकारी (र. व का.), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

७. सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर प्रत अधिकृत समजण्यात यावी.

**(दीपा देशपांडे)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रति,**

१. अवर सचिव, वित्त विभाग (प्रशा. कोषा.३), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.

२. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, नवी मुंबई.

३. संबधीत कर्मचाऱ्यांच्या सध्याच्या पदावरील कार्यालय प्रमुखांना सस्नेह अग्रेषित. **(प्रतिनियुक्ती वगळून)**

अ.क्र. ४ व ५ नुसार कार्यवाही करण्याकरिता.

४. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

५. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व)

६. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा (सर्व)

७. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)

८. लेखा अधिकारी (र. व का.), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.

अ.क्र. ४ व ५ नुसार कार्यवाही करण्याकरिता **(प्रतिनियुक्ती वरील अधिकाऱ्यांच्या बाबतीत.)**

९. संबंधित अधिकारी.

१०. निवड नस्ती.